# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ३०/०४/२०२४

खुन :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अप. क्र. ४०५/२०२४ कलम ३०२ ,३२४, ५०४, ३४ भा. द. वि. | बालाजी नगर, मंगलधाम कॉलनी, अमरावती. | घटना ता वेळ - दि. २९.४.२०२४ चे १६.०० वा ते १६.१५ वा. दरम्यान. माहिती ता वेळ - दि. २९.०४.२०२४ चे १७.४७ वा. दरम्यान. दाखल ता वेळ - दि. २९.०४.२०२४ चे २०.५८ वा. | विजय निळकंठराव देशमुख, वय ७१ वर्ष, व्यवसाय सेवानिवृत्त , रा. बालाजी नगर, मंगलधाम, कॉलनी, अमरावती. | १) देवानंद श्रीकृष्ण लोणारे, वय ४५ वर्ष, २) एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी शेजारी शेजारी राहणारे असुन आरोपी नेहमी प्लॉटच्या जागेच्या तारेच्या वालकंम्पाऊन्डच्या कारणावरुन वाद विवाद करुन शिवीगाळ करुन भांडण करीत होते. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादीचा मुलगा त्यांच्या घराच्या समोर लोखंडी गेट जवळ फोनवर बोलत असतांना यातील नमुद आरोपींनी फि. चा मुलगा मृतक सुरज यास तारेच्या वालकंम्पाऊन्डच्या कारणावरुन शिवीगाळ करीत लोखंडी सब्बल व क्रिकेटची बँट घेऊन आले व आरोपी क्र. १ याने सुरजच्या डोक्यावर लोखंडी सब्बल जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने मारली. त्याच्या आवाजाने फिर्यादीची बाहेर धावत आली असता तिच्या डोक्यावर सुध्दा जीवाने ठार मारण्याच्या उद्देशाने लोखंडी सब्बलने वार केला तसेच आरोपी क्र. २ हिने बॉटने मारहान केली. फिर्यादी वाचविण्याकरीता गेले असता यातील आरोपी क्र. १ याने त्यांच्या डोक्यावर, खांद्यावर सब्बल मारुन जखमी केले. तेव्हा फिर्यादीने आरोपीस धक्का दिला आरोपी खाली पडला तेव्हा कॉलनीतील राहणारे सागर धुळे व पवन चिंचे हे आल्यामुळे आरोपी पळुन गेला. तेव्हा फिर्यादी व इतर नागरिकांनी उपचारा करीता जखमीना दवाखान्यात नेले असता डॉक्टर यांनी फि. चा मुलगा सुरज व पत्नी यांना मृत घोषीत केले. अशा प्रकारे आरोपी १ व २ यांनी फि. चा मुलगा व पत्नी यांना जीवाने ठार मारले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ स्त्रि अत्यांचार :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोठाणे बडनेरा अप क्र ३००/२०२४ कलम ३७६,(२)(एन)भादंवि सहकलम ३,१,(w)(i)(ii)अ,जा,ज,प्र,का | अम. | दि २६/०३/२०२४ चे १४.००वा ते आगस्ट दि २०२३ दाखल दि २९/०४/२०२४ चे १७/१४ वा | एक महिला | सुजित संजय लांडोरे वय २२ वर्षे रा जुनी वस्ती बायपास जवळ बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की दि २६/०४/२०२४ रोजी आरोपीच्या मित्राचा वाढदिवस असल्याने पार्टी करण्या करीता गेले व आरोपीने फिर्यादीला गुलाबाचे फुल देवुन माझे रुम वर चल म्हणुन फि ही आरोपी सोबत त्याचे रुम वर गेली नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील आरोपीने फिर्यादीला लग्नाचे आमीष देवुन शारीरीक संबंध केले व वारंवार करत राहला फिर्यादीने आरोपीला लग्न कर असे म्हटले असता आरोपी हा टाळाटाळ करत होता व आपली जात वेगवेगळी असल्यामुळे माझे घरचे लग्नाला नकार देणार म्हणुन मी लग्न करत नाही असे म्हणुन टाळाटाळ करत होता आतापावेतो फि ने लग्नासाठी वाट पाहली पण आरोपी ने लग्नासाठी स्पष्ठ नकार दिला यातील आरोपीने लग्नाचे खोटे आमीष वारंवार शारीरीक संबंध प्रस्थापीत केले व लग्न करण्यास तयार नाही अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ जबरी चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ४१८/२०२४ कलम ३९४,३९७, ४५२,५०४ भादवी | राहते धरी महात्मा फुले नगर नवसारी अमरावती | घतावेळ दि २८.४.२०२४ चे ०२.०० वा दरम्यान<br><br>दि २९.४.२०२४ चे २१.१५ वा | अक्षय बाळु जुनघरे वय २७ वर्ष महात्मा फुले नगर नवसारी अमरावती | १ कंलेश नितनवरे<br>२.हर्षल पोहकार<br>३.सनी वाकोडे<br>४. वेदांत गवई सर्व रा.नवसारी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी यातील फिर्यादी हे घरी झोपले असतांना यातील नमुद सर्व आरोपी हे फि चे घरात घुसुन लाकडी दंडे व सळीखी आणि लोखंडी रॉडने मारहान केली तसेच घरातील खीडकी माठ झोडला. घरातील लोखंडी पेटीतुन ५००० रू काढुन घेवुन गेले वरून सदर चा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. नांदगांव पेठ अप क्र. १५७/२०२४ कलम ३७९ भादवी | वडगाव माहुरे रोडवर पॉलीकॅब इंडिया लिमीटेड या कंपनीचे स्टोअर | २९/०४/२०२४ चे ०३.०० वा दाखल २९/०४/२०२४ चे २०.२२ वा | मोहम्मद रफिक मो. शरीफ शेख वय ३६ वर्षे रा. फ्रेजरपुरा अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, फि. यांचे वडगाव माहुरे येथे पॉलीकॅब इंडिया लिमीटेड या कंपनीचे स्टोअर आहे व त्यावर चौकीदार पण आहे. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फि. यांच्या इंडिया लिमीटेड या कंपनीचे स्टोअर मधुन १) चेन्ज ओवर स्विच कि. १४४७१/- २) वेज कनेक्टर कि.अं. २०४०००/- ३) सी.टीपिटी. कनेक्टर कि.अं. ३६९६०/- असा एकुन २,५५,४३१ चा माल कोणीतरी अज्ञात इसामने ओपन प्लेस तारेच्या कंपाउंड मधुन चोरुन नेले त्या स्टोअर वर चौकीदार आहे परंतु चौकीदार हे झोपलेले होते चौकीदार २,३ महिण्यापासुन देखरेख करण्यासाठी आहे. अशा फिय यांच्या जबानी रि वरुन गुन्हा दाखल |

➢ विश्वासघात/फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोठाणे बडनेरा अप क्र ३०१/२०२४ कलम ४६७,४६८ भादंवि | मौजे मसला येथील शेत सर्वे न ४३/२/अ शेतामध्ये | दि २८/०३/२०२४ रोजी चे ११.०० वा ते १५.०० वा<br><br>दाखल दि २९/०४/२०२४ चे १८,५४ वा | एक महिला | १)फराज बेग वय २७. वर्षे रा इंगोलेपुरा ,मरकस मस्जीद जवळ बडनेर ा ता जि अमरावती ,२)शहेबाज बेंग शहादत बेग उर्फ (मुन्ना बेग)वय २९ वर्षे रा ,मरकस मस्जीद जवळ बडनेर ा ता जि अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादीने याचे कडील पत्र क्र जमावबंदी /म.सं./का.वि/१५३/२०२४ दि १०/०४/२०२४ या पत्राचे अनुशगाने मौजे मसला येथील शेतसर्वे न ४३/२/अ शेतामध्ये नमुद आरोपी यांनी बोगस नारकत प्रमाणपत्र बँकेत सादर केल्याचे प्राथमीक माहीती दि २८/०४/२०२४ रोजी तहसिलदार अमरावती शहर यांना मीळाल्याबाबत तहसिल कार्यालय अमरावती शहर यांनी संबधीताना नोटीस बजावणी करण्यात आली शेतसर्वे न ४३/२/अ हा अजय होतीलाल गोयल रा मसला ता जि अमरावती याचे जागेवर विट्टाभट्टी चालवण्याकरीता यातील आरोपी यांनी तहसिल कार्यालय अमरावती शहर याचे पत्र तयार करुन त्यामध्ये मजकुर नाहरकत प्रमाणपत्र बनावट तयार केले व त्यावर सही शिक्का बनावट असुन उपरोक्त प्रकरणात आरोपी यांनी कबुली दिल्याने दि ०४/०४/२०२४ रोजी बयान दिले व वास्तुक फायनान्स उस्मानिया मस्जीदजवळबस स्टॅन्ड रोड अमरावती येथे सादर केले व व त्यावर लोन काढण्याकरीता सदर बनावट प्रमाणपत्र तयार करुन लोण काढण्याच्या इराद्याने सदर प्रमाणपत्राचा वापर केला जाणार होता. अशा फिचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. नांदगांव पेठ अप क्र. १५८/२०२४ कलम २७९, ३३७ भादवी | NH६ रोड SA बार समोर नागपुर अमरावती रोड | २९/०४/२०२४ चे २०.०० वा दाखल २९/०४/२०२४ चे २२.४७ वा | एक महिला | **MH 27 AY 5641** चा चालक | हकिकत अशा प्रकारेआहे की , फि. यांची आई आणि भावाची मुलगी व बहिणीचा मुलगी यांच्यासह दिप प्रतिष्ठाण कॉलणी येथे गेली होती नमुद. घयता.वेळ व ठिकाणी घरी परत येत असतांना NH६ रोड SA बार समोर नागपुर अमरावती रोड वर नमुद आरोपीने आपले ताब्यातील वान क्र **MH 27 AY 5641** चा चालकाने निष्काळजीपणे व भरधआव वेगाने चालवुन फि. च्यआ आईला व दोन मुलींना धडक मारुन जखमी केले अशा दुचाकी चालका विरुध्द गुन्हा दाकल |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो ठाणे कोतवाली अप क्र. १६९/२४ कलम २८३ भादवी | चौधरी चौक अमरावती | दि. २९.०४.२०२४ चे ११.३० वा दाखल ता वेळ दि.२९.०४.२०२४ चे १७.४९ | स पो उप नि राजेश सपकाळ ब नं ६२४ पो स्टे सिटी कोतवाली अम शहर | नीरज सिह रामशिरोमणी सिह वय ३० रा सरायमपुरा कोला तहसील सुल्तानपुर राज्य उत्तरप्रदेश ह मु बॉम्बे फैल अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी पो स्टाफ सह पो स्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असता नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा आपल्या ताब्यातील हातगाडी हि सार्वजनिक ठिकाणी रोडवर धोकादायक स्तितीत उभे करुन वाहतुकीस अडथडा निर्माण करतांना दिसला वरुन नमुद ठिकाणी पंचाना बोलावुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव नीरज सिह रामशिरोमणी सिह वय ३० रा सरायमपुरा कोला तहसील सुल्तानपुर राज्य उत्तरप्रदेश ह मु बॉम्बे फैल अमरावती असे सांगितले नमुद ईसमावर कलम २८३ भादवी प्रमाने गुन्हा दाखल |

➢ जुगार रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| ०१ | पोस्टे गाडगे् नगर अमरावती | अपक्र ४१७/२०२४ कलम १२ अ भादवी | हबीब नगर न.२ अमरावती | दि २९.४.२०२४ चे १०.०० वा म | दि २९.४.२०२४ चे १६.४२ वा | नापोकॉ दिनेश गोपालराव नांदे बनं १३६१ पोस्टे गाडगेनगर अम | १.मोहम्मद वाजीद मोहम्मद शब्बीर २.मोहम्मद सादिक शेख रज्जाक दोम्ही रा. हबीब नगर न.२ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी गुप्त माहीती वरून स्टाफ चे मदतीने नमुद घतावेळी व ठीकानी छापा घातला असता दोन इसम लोकानकडुन पैसे घेवुन वरली चे १ ते १० अंक लीहीलेल्या चीठया देतांना जागीच मीळुन आले त्याचे ताब्यातुन १ ते १० आकडे लीहीलेल्या चीठया नगदी ६१६०रू असा जुगार माल मीळुन आला वरून सदर चा गुन्हा दाखल |

➢ अकस्मात मृत्यु:-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटाा स्थळ | घटाा ता वेळ दाखल ता वेळ | मृतकाचे ांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| | पो.स्टे. फ्रेजरपुरा, मर्ग क्र. ३१/२०२४ कलम १७४ जा. फौ. | राहते घरी व्यंकय्या पुरा , अमरावती . | घ. ता . वेळ - दि. २२.४.२०२४ चे १२.३० वा. दाखल ता वेळ - दि. २९.०४.२०२४ चे १६.१८ वा. | अनिता दामोधर भोंबेकर , ५८ वर्ष, रा. व्यंकय्यापुरा, अमरावती. | मनोज हरिभाऊ दरवळकर, वय ५७ वर्ष, धंदा खाजगी ठेकेदार रा. रामपुरी छत्तीसगड, | हकिकत अशा प्रकारे आहे की, नक्कल जबानी रिपोर्ट पो.स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती आज दि. २९.०४.२०२४ रोजी ०८.०० वा ते १४.०० वा. तपास मदत ड्युटी असतांना फिर्यादी नामे मनोज हरिभाऊ दरवळकर वय ५७ वर्ष, रा. मंडी गेट पोस्ट ऑफिस रायपुर छत्तीसगड अशोक विहार कॉलनी यांनी पो. स्टे. ला येऊन जबानी रिपोर्ट दिला कि, दि. २२.०४.२०२४ रोजी मृतक बहिनीच्या पुतण्या नामे भुषण भोंबेकर यानी मोबाईलवर फोन करुन सांगीतले की, मोठी मम्मी (मृतक) हि घरात पडली असुन तिचे डोक्याला मार लागला असुन तिला मोहल्यातील लोकांनी डॉ. पंजाबराव हॉस्पीटल येथे भरती केले आहे. वरुन मी बंजाबराव हॉस्पीटल येते आलो असता ती आय. सी. यु. मध्ये भरती केले होते व कोमा मध्ये होती आज दि. २९.०४.२०२४ रोजी उपचारादरम्यान तिचा मृत्यु झाला आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्टवरुन व इर्विन हॉस्पीटल ब्रॉंड डेड मेमो क्र. ३५० वरुन सदरचा मर्ग दाखल |

.